मजकुर :—

दिनांक ०९/०६/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने ष **Best Detection of the Month "** माहे एप्रिल २०२१ या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ एप्रिल — २०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | व्हि.पी.रोड पोलीस ठाणे परिमंडळ — ०२ | गुरक्र. ८७/२१, कलम ४५२,३९४, १२०(ब),३४ भादवि |

—: ' जबरी चोरी ':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत : दिनांक. ०२/०४/२१ रोजी दुपारच्या वेळेस नरेश हरीराम चौधरी, वय १९ वर्ष. याने फिर्यादीच्या घरी जावुन मोबाईल चार्जरच्या बहान्याने त्याचे साथीदार नारायणसिंग पिरसिंग राजपुत व जितेंद्रसिंग कालुसिंग गडवी यांचे सोबत फिर्यादीच्या घरात प्रवेश करून फिर्यादीस पाठीमागुन ठकलुन त्यांना खाली पाडले व त्यांचे तोंड दाबुन बळाचा वापर करून त्यांना जबरदस्ती खाली जमिनीवर पाडले. तसेच साथीदाराने फिर्यादीचे कपाटाचे लॉक तोडून त्यात ठेवलेली वर नमुद रोख रक्कम रू. ७२,८८,६२०/— जबरी चोरी करून पळून गेले म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती. मंजुबेन सुरेशभाई शेठ, वय ४९ वर्ष. |
| चोरीस गेलेला माल | :— | रोख रक्कम रू. ७२,८८,६२०/— |
| हस्तगत माल | :— | रोख रक्कम रू. ६४,०३,३४०/— |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) नानजी बिराराम देवासी, वय १९ वर्ष.<br>२) गोवाराम विरमाराम देवासी उर्फ गोपाळ, वय २५ वर्ष.<br>३) नारायणसिंग पिरसिंग राजपुत, वय ३२ वर्ष.<br>४) नरेश हरीराम चौधरी, वय १९ वर्ष.<br>५) जितेंद्रसिंग कालुसिंग गडवी, वय २३ वर्ष.<br>१) आरोपी क्र. १ व २ यांना दिनांक. ०९/०४/२१ रोजी<br>२) आरोपी क्र. ३ व ४ यांना दिनांक. १६/०४/२१ रोजी<br>४) आरोपी क्र. ५ यास दिनांक. २५/०४/२१ रोजी |

तपास कौशल्य :— गुन्हयाच्या तपासा दरम्यान ५ पोलीस पथके तयार करून आरोपीचा शोध चालू केला. प्राथमिक तपासात सी.सी.टी.व्ही फुटेजच्या माध्यमातुन अटक आरोपी टॅक्सीने कंळबोली येथे गेले असल्याची माहिति मिळाली. त्यानुसार त्यांचा शोध घेण्याकरीता कळंबोली येथे पथक रवाना करण्यात आले. अटक आरोपीतांचा शोध चालू असताना ते नालासोपारा येथे गेले असल्याची माहिति मिळाली. त्यानुसार त्यांचा नालासोपारा येथे जावुन शोध घेतला असता ते राजस्थान व गुजरात चे रहिवाशी असल्याने ते राजस्थान व गुजरात येथे गेले असल्याची माहिति मिळाली. त्यानुसार तात्काळ पोलीस पथक राजस्थान व गुजरात येथे रवाना करण्यात आले.

आरोपीतांनी गुन्हा करण्याच्या आगोदर पासुन त्यांची ओळख लपवली होती. त्यांचे बाबत काहीच माहिती उपलब्ध होत नसल्याने तांत्रिक माहितीच्या आधारे एकुन १९२ मोबाईल क्रमांकाचे सीडीआर व २३ IMEI चे विश्लेषन मा. परिमंडळ—०२ कार्यालयातून प्राप्त तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचे Live Location प्राप्त करून बाहेरगावी तपासकामी असलेल्या पोलीस पथकास वेळोवेळी त्यांची माहिती देण्यात आली. त्याअनुषंगाने तपासी पथकाने आरोपीतांचा पाठपुरवा करून अथक प्रयत्नानंतर आरोपीतांना अटक केली.

नमुद गुन्हयात आरोपी नानजी बिराराम देवासी व गोवाराम विरमाराम देवासी उर्फ गोपाळ यांना दिनांक. ०९/०४/२१ रोजी रा. राजस्थान यथे अटक करण्यात आली. तसेच नरेश हरीराम चौधरी व नारायणसिंग पिरसिंग राजपुत यांना दिनांक. १२/०४/२१ रोजी सुंधा गॅरेज, भागोडा रोड, सियावट सायला, जालोर, रा. राजस्थान येथून ताब्यात घेवून त्यांना सायला पोलीस ठाणे, जि. जालोर, रा. राजस्थान येथे अटक करून त्यांना मा. ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट जालोर, जि. जालोर, रा. राजस्थान यांचे न्यायालयात हजर करून त्यांना मा. अति मुख्य महानगर दंडाधिकारी, ४ थे न्यायालय, गिरगांव, मुंबई. यांचे न्यायालयात दिनांक. १८/०४/२१ रोजी पर्यंत ट्रॅन्झीस रिमांड घेवून दिनांक. १७/०४/२१ रोजी वि. प. मार्ग पोलीस ठाणेच्या अभिलेखी अटक करण्यात आली.

नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी जितेंद्रसिंग कालुसिंग गडवी, हा मरीया खेडी, जि. निमच, रा. मध्य प्रदेश मध्यप्रदेश येथे असल्याची माहिती मिळाल्याने कुकडेश्वर पोलीस ठाणेच्या पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या मदतीने सदर ठिकाणी त्याचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही. पुन्हा त्याचा शोध चालू केला असता तो मु. पो. सुमाडीया, ता. कलंबा, जि. राजसमंद, रा. राजस्थान येथे असल्याची खबर मिळाल्याने केलवा पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदाराच्या मदतीने त्याचा नमुद ठिकाणी शोध घेतला असता तो मिळून आल्याने दिनांक. २५/०४/२१ रोजी अटक करण्यात आली.

वर नमुद अटक आरोपीतांना अटक करतेवेळी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्यात आले. तसेच त्यांचे अटकेची माहिती त्यांचे नातेवाईकांना देण्यात आली. अटक आरोपीतांनी केलेल्या निवेदनानुसार गुन्हयातील जबरी चोरी केलेल्या रोख रक्कम रू. ७२,८८,६२०/— पैकी रोख रक्कम रू. ६४,०३,३४०/— हस्तगत करण्यात आले आहेत.नमुद गुन्हयातील अटक आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत असुन, गुन्हाचा तपास चालू आहे.

**व्हि.पी.रोड पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | हेमंत बावधनकर. | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | अविनाश मांदळे. | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | राजाराम पोळ. | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस उप निरीक्षक | सिध्देश जोष्टे. | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोलीस उप निरीक्षक | दिलीप तांबे. | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस उप निरीक्षक | अभिजित देशमुख. | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | शिवाजी बोरसे. | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.ह.क्र. २९३४० | गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.ह.क्र. ३२४२८ | महांगडे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ह.क्र. ३२५६७ | निर्मल | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र. ३४३५० | सुर्यवंशी | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ना.क्र. ००१०८ | आंबेकर | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ना.क्र. ०३५०५ | सिंग | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ना.क्र. ०३७५१ | गिरकर | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ना.क्र. ०३८०६ | साळवे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ना.क्र. ०३११२५ | परब | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ना.क्र. ०४०११३ | आहेर | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | पो.शि.क्र. ०७१३०० | सरवदे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.शि.क्र. ०९२५६५ | कुंभार | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र. ११०१२२ | पाथरूट | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.शि.क्र. ११०९८९ | शेख | प्रशस्तीपत्रक |

| | | |
|---|---|---|
| ०२ | विलेपार्ले पोलीस ठाणे परिमंडळ – ०८ | **गुरक्र. ६०/२०२१ कलम ३९५, १७०, १२०(ब), ४१४, ३४ भादंवि** |

—: ' पोलीस असल्याचे भासवुन, जबरीने चोरी करणे.':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :** नमुद गुन्हयात दिनांक १७/०२/२०२१ रोजी बावा इंटरनॅशनल हॉटेल, नेहरू रोड, विलेपार्ले (पु), मुंबई येथे बाहेरून आलेले दोन प्रवासी थांबले होते. सायंकाळी काही इसम हे बावा इंटरनॅशनल हॉटेल या ठिकाणी थांबलेल्या सदर दोन इसमांकडे आले व त्यांनी ते पोलीस असल्याचे भासवुन त्यांच्याकडील असलेल्या बनावट ओळखपत्र तसेच कमरेला लावलेले बनावट पिस्तुल सदर दोन प्रवासी यांना भिती घालुन त्या दोन इसमांच्या ताब्यात असलेले अंदाजे १२ करोड रूपये इतक्या रकमेची जबरीने चोरी केली. अशी माहिती फिर्यादी श्री. आनंद अशोक इंगळे, वय २९ वर्षे, यांना दिनांक १७/०२/२०२१ रोजी सायंकाळी माहीती प्रप्त झाली. त्यानुसार त्यांनी दिनांक १९/०२/२०२१ रोजी विलेपार्ले पोलीस ठाणे येथे समक्ष हजर राहुन सदर बाबत पोलीसांकडुन कारवाई व्हावी अशी विनंती केल्याने मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. आनंद अशोक इंगळे, वय २९ वर्षे, |
| चोरीस गेलेला माल | :— | रोख रक्कम १२ कोटी रूपये |
| हस्तगत माल | :— | एकुण ७ कोटी ७० लाख ७६ हजार रूपयेची मालमत्ता (रोख रक्कम, वाहने व सोन्याचे दागीने) |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) दिनेश श्रीरामधन दुरेजा वय ५४ वर्षे<br>२) गफुर मोहम्मद सत्तार मोहम्मद वय ४४ वर्षे<br>३) दिनेश जनार्दन पाथारे वय ४५ वर्षे,<br>४) आरिफ सजोद्दिन सय्यद वय ३१ वर्षे,<br>५) प्रेमचंद मेवालाल जैस्वाल वय ४६ वर्षे<br>६) निलेश शिवानंद भिंगारदिवे वय ३६ वर्षे,<br>७) सगीर अजगर खान वय ४४ वर्षे,<br>८) प्रविण उदयलाल जैन वय ४२ वर्षे,<br>९) आसिफ सजोद्दिन सय्यद वय २७ वर्षे<br>१०) लक्ष्मण राजाराम चंदनशिवे उर्फ कार्तिक वय ४९ वर्षे,<br>११) हेमंद जयसिंग केदार वय ५० वर्षे<br>१२) दिनेश रामवृक्ष गुप्ता वय ५२ वर्षे<br>१३) दिलशाद इसरार सिध्दीकी उर्फ शेख वय ४२ वर्षे<br>१४) मझहर सगीर खान वय २४ वर्षे,<br>१५) सना सगीर खान वय ४० वर्षे<br>१) आरोपी क्र. १ व २ यांना दिनांक. ०९/०४/२१ रोजी<br>२) आरोपी क्र. ३ व ४ यांना दिनांक. १६/०४/२१ रोजी<br>४) आरोपी क्र. ५ यास दिनांक. २५/०४/२१ रोजी |

<u>तपास कौशल्य</u> :— नमुद गुन्हयात फिर्यादी श्री. आनंद अशोक इंगळे, वय २९ वर्षे, यांनी

पोलीस ठाणे येथे दिलेल्या माहीतीची सत्यता पडताळुन गुन्हा नोंद करण्यात आला. नमुद गुन्हयात कोणताही दुवा नसतांना घटनास्थळावरील फुटेज, प्रत्यक्षदर्शी साक्षिदार तसेच परीस्थीतीजन्य पुरावे यांचे कौशल्यपुर्व अवलोकन तसेच तांत्रिक तपासात सीडीआर/एसडीआरचे अवलोकन करून आरोपी निष्पन्न करण्यात आले. आरोपींचा सीडीआर, सीसीटीव्ही फुटेज यांच्या आधारे शोध घेवुन एकुन ८ आरोपींनी मुंबई व उपनगरे परीसरातुन एकाच दिवशी अटक करण्यात आली.

गुन्हयाच्या अनुषंगाने आरोपींकडे तपास करून सीसीटीव्ही फुटेज, सीडीआर, साक्षिदार तसेच परीस्थीतीजन्य तांत्रिक पुराव्यांच्या सहाय्याने अहोरात्र अथक परिश्रम करून मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ८, श्री. मंजुनाथ सिंगे, यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने २८ दिवस तपास करून गुन्हयात आरोपींनी दरोडा टाकुन चोरलेली मोठया प्रमाणात रोख रक्कम हस्तगत करण्यात आली.

गुन्हा करताना आरोपीतांनी पोलीस असल्याची बतावणी करून गुन्हा केला होता. नमुद गुन्हयात दरोडा टाकणाऱ्या मुख्य आरोपीतांना अटक करून त्यांच्याकडुन बनावट ओळखपत्र, बनावट अग्नीशस्त्र, वॉकीटॉकी व रोख रक्कम रूपये ७ कोटी १० लाख ७६ हजार व सोन्याची दागिने किंमत रूपये ११,४८,०००/— लाख रूपये व मो/वाहने अं.किं., ४८,५२,०००/— लाख रूपये असे एकुण ७ कोटी ७० लाख ७६ हजार रूपये किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली.

अशा प्रकारे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस असल्याची बतावणी करून गुन्हा करणाऱ्या सराईत टोळीचा छाडा लावून व कोठलाही अभिलेख नसलेल्या गुन्हेगारांना अटक करून जनतेत तसेच व्यापारी वर्गात पोलीसाविषीयी विश्वास वाढवला आहे.

**विलेपार्ले पोलीस ठाणे, पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | नितीनकुमार कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | राजेंद्र काणे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | शिवशंकर भोसले | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | किशोर डोईजड | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोलीस उप निरीक्षक | प्रविण घाडगे | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस उप निरीक्षक | सचिन पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | अमोल चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पोलीस उप निरीक्षक | मुदस्सर पटेल | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.ह.क्र. २९४२९ | प्रविण चिपकर | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ना.क्र. ८४२ | बिपीन गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ना.क्र. ९६१३२४ | यशवंत महाले | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ना.क्र. ०३०७९८ | दत्तात्रय माने | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ना.क्र. ०६०२४१ | दिपक महाजन | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ना.क्र. ०६३८५ | दिपक खंदारे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | म.पो.ना.क्र. ००.९८ | गिता चोपडे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.शि.क्र. ०७१४८७ | यागेंद्रसिंग शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.शि.क्र. ०९३५९९ | योगेश मोरे | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.शि.क्र. १११७२३ | अनिल तांबे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.शि.क्र. १११९७६ | मयुर घाडगे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र. ११२९१७ | अमृत राठोड | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.शि.क्र. ०९३२७८ | धनेश आचार्य | |

मजकुर :—

दिनांक ०९/०६/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे एप्रिल –२०२१ या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष–०९ | गु.र.क्र. १९/१२ (बांद्रा पोलीस ठाणे गु.र.क्र.४६/१२/१२) कलम ४८९(अ), ४८९(ब),४८९(क),३४, १२०(ब) भा.द.वि. |

–: ' बनावट भरतीय चलनी नोटा वितरीत करणे.' :–

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :– नमुद गुन्हयात दिनांक ०७/०२/२०१२ रोजी ०९.३० वा ते १२.०० वा चे दरम्यान नंदीगल्ली, बस रूट क्र.२२० च्या बस स्टॉपवर, गुरूनानाक रोड, बांद्रा (प.), मुंबई या ठिकाणी रूपये मुल्य असलेल्या एकुण ३०० बनावट भारतीय चलनी नोटा घेवुन त्या बनावट असल्याचे माहित असुनही त्या पश्चिम बंगाल येथुन आणुन संगनमताने खऱ्या असल्याचे भासवुन भारतीय चलनी नोटामध्ये वितरीत करण्यासाठी स्वत:जवळ बाळगल्या म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्री दिपक अंनत सावंत वय ४२ वर्षे, |
| हस्तगत माल | :– | रू १००० दराच्या एकुण ५६० व रू ५०० दराच्या एकुण ८० बनावट भारतीय चलनी नोटा एकुण ६,००,०००/– |
| निकाल दिनांक | :– | २८/०४/२०२१ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :– | १) कलम ४८९(क) भा.दं.वि. साठी ०५ वर्षे सक्तमजुरी व दंड रु. ५,०००/– दंड न भरल्यास ०२ महिन्यांचा कारावास,<br>२) कलम १२०–ब भा.दं.वि. साठी ०५ वर्षे सक्तमजुरी व दंड रु. ५,०००/– दंड न भरल्यास ०२ महिन्यांचा कारावास,<br>**(सर्व शिक्षा एकाचवेळी भोगल्या जातील),**<br>सदर आरोपीतास कलम कलम ४८९(अ), ४८९(ब) भा.दं.वि. या कलमांतुन दोषमुक्त केले आहे. |

तपास कौशल्य :– या कक्षातील नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उच्च प्रतीच्या बनावट भारतीय चलनी नोटा भारतीय बाजारपेठेत वितरीत करुन भारतीय अर्थव्यवस्थेस क्षती पोहचविणा–या एकुण दोन आरोपीतांना कौशल्याने अटक केले. त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण व सातत्यपुर्ण तपास करुन त्यांच्याकडुन गुन्हयाच्या पुराव्याच्या अनुषंगाने परिस्थितीजन्य व कागदोपत्री पुरावे प्राप्त करुन विहीत वेळेत दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर केले.

दोषारोपपत्र सादर केल्यानंतर खटल्याच्या संपुर्ण कामकाजामध्ये साक्षीदारांना समन्स बजावणी करुन त्यांना गुन्हयाची गंभीरता सांगुन साक्षकामी प्रवृत्त केले. त्यांच्या वैयक्तिक अडचणींचे निरसन करुन त्यांना खटल्याच्या कामकाजासाठी उदयुक्त केले. त्यांची साक्ष त्यांच्या भाषेमध्ये समजावुन सांगुन मा. न्यायालयात विहीत दिवशी व वेळेत हजर ठेवले. यातील प्रत्यक्षदर्शी ०२ साक्षीदारंनी आरोपींच्या विरुध्द साक्ष दिली असल्याने त्यांना खटल्याच्या साक्षीच्या वेळी प्रवृत्त करुन त्यांना साक्ष पढवुन मा. न्यायालयात हजर ठेवल्याने खटल्यास पोषक साक्ष नोंदवली.

संपुर्ण कामकाजामध्ये सरकारी अभियोक्ता यांचेशी वेळोवेळी चर्चा करुन त्यांच्या मार्गदर्शनानुसार न्यायालयीन प्रक्रीयेत मदत करण्यात आली. अटक आरोपी विरुध्द प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, परिस्थितीजन्य व कागदोपत्री असा सबळ पुरावा जमा करुन तो खटल्याच्या सुनावणीत सादर करण्याकरीता अथक परिश्रम करुन विहीत वेळेत सादर केल्याने आरोपीतांना जास्तीत जास्त शिक्षा झालेली आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–०९, तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | सुधीर जाधव | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | अरुण सातपुते (सेवानिवृत्त सपोआ.) | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | वाल्मिक निंबा कोरे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ह.क्र. ३३१५४ | राजेंद्र लिलाधर पेडणेकर. | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ह.क्रं. ३२६८० | फकीरा रेहमान शेख | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.ना.क्रं. ०५—३०४ | विकास रामचंद्र पवार | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.शि.क्रं. ०३—१२२३ | प्रविण कृष्णा कांबळे | प्रशस्तीपत्रक |